# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




**◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉**

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ दिनांक :
Ref. No. : PAHSU/BOEE/ Date :

जा. क्र. पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन/वेळापत्रक/२०२१/466 दि. 27 APR 2021

प्रति
मा. प्राचार्य/संचालक (विद्यापीठ संकुले),
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर

विषय : पदवी व पदव्युत्तर सत्र १ व २ ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा मे २०२१ मध्ये आयोजनाबाबत...

महोदय/महोदया,

आपणास वरील विषयास अनुसरुन माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२० ची पदवी व पदव्युत्तर सत्र १ व २ ची परीक्षा **दि.०६ मे २०२१** पासून सुरु करण्यात येत आहे. सदरच्या परीक्षा हया फक्त ऑनलाईन माध्यमाव्दारे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपात असणार आहेत. Smart Phone/Laptop/ Desktop या व्दारे परीक्षा देता येतील. या परीक्षेच्या आयोजनासाठी महाविद्यालय व विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे काही सूचना देण्यात येत असून, त्यानुसार कार्यवाही करावी.

१. सदरची परीक्षा ही ५० प्रश्नांची बहुपर्यायी असून प्रत्येक प्रश्नास १ गुण याप्रमाणे ५० गुणांची परीक्षा असणार आहे. त्या ५० गुणा पैकीच्या गुणांचे मुळ Pattern च्या गुणा मध्ये रुपांतरीत केले जाणार आहेत.
२. प्रत्येक पेपरचा कालावधी हा १ तासाचा आहे. काही तांत्रिक अडचणी मुळे Connectivity उपलब्ध झाली नाही तर त्यावेळी विद्यार्थ्यांनी Connectivity मिळाल्यानंतर त्याच वेळेत उरलेले प्रश्न वेळेप्रमाणे पूर्ण करावेत. यासाठी सदरची प्रश्नपत्रिका या वेळापत्रकाप्रमाणे २ तास उपलब्ध असतील.
३. विद्यार्थ्यानी Online परीक्षेदरम्यान काही तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास, त्या अडचणी सोडविण्यासाठी परीक्षा सुरु असतांना Help line number वर कॉल करुन अडचणी सोडवून घेता येतील.
४. विद्यार्थ्यासाठी Mock Test चे आयोजन करण्यात येणार असून त्याची माहिती वेळोवेळी Login मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरिता विद्यार्थ्यांनी वेळोवेळी आपले Login Id तपासून पहावे.
५. विद्यार्थ्यांशी त्वरीत संपर्क साधता यावा याकरिता महाविद्यालयांनी अभ्यासक्रमनिहाय Whatsapp/ Telegram Group तयार करावे व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती विद्यार्थ्यांच्या निर्देशनास आणावी.

६. ज्या विद्यार्थ्यांना Smart Phone/Laptop उपलब्ध करुन घेण्यास अडचणी असतील, अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे जवळचे नातेवाई/मित्र व इतर माध्यमातून सदर साधने उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत सुचित करण्यात यावे. सदर साधने उपलब्ध होत नसल्यासच महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षेसाठी संगणक संच इंटरनेट सह उपलब्ध करुन द्यावेत. जेणेकरुन या परीक्षेपासून एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही. याबाबत महाविद्यालयाने दक्षता घ्यावी. याकरिता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

७. संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या वेळापत्रकाप्रमाणे असलेल्या विषयांप्रमाणे विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी.

८. विद्यार्थ्यांची ज्या विषयांची संधी संपलेली आहे, अशा विषयांकरिता समकक्ष विषयाप्रमाणे परीक्षा द्यावी. (जरी प्रवेशपत्रावर जुन्या विषयाची नोंद असली तरी)

९. विद्यापीठ परीक्षेचे वेळापत्रक, त्यात होणारे बदल व इतर अनुषंगिक अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला वेळोवेळी भेट द्यावी.

१०. सर्व संलग्नित महाविद्यालयांनी परीक्षेबाबतची सुचना/माहिती जास्तीत जास्त विद्यार्थ्यापर्यंत पोहचविण्यासाठी परिपत्रकाव्दारे, महाविद्यालयाचे संकेतस्थळ, सूचना फलक, सोशल मिडिया, ऑनलाईन माध्यमातून प्रयत्न करावा.

११. सर्व विद्यार्थ्यांचे Login ID व Password याबाबतची माहिती संबंधित विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावी.

१२. विद्यापीठाच्या विविध परिपत्रकान्वये परीक्षा आयोजनाबाबत कळविण्यात आलेल्या सुचना व नियमांचे तंतोतंत पालन करुन परीक्षा कॉपी विरहित वातावरणात पार पाडाव्यात.

१३. या परीक्षेकरीता Negative Marking पध्दत लागू राहणार नाही.

१४. दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे अतिरिक्त वेळ दिला जाईल.

१५. वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या /बहुपर्यायी Multiple Choice Question (MCQ) परीक्षांसाठी फोटोकॉपी व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध नाही.

वरीलप्रमाणे सुचना विद्यार्थी व सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून द्यावी. सदरच्या ऑनलाईन परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

२३/४/२०२१

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ